| | |
|---|---|
| MHLA050011832025 | दाखल दिनांक : - १२/११/२०१८<br>नोंदणी दिनांक : - १२/११/२०१८<br>निकाल दिनांक :- ०८/०५/२०२६<br>कालावधी:-**०७ वर्षे, ०५ महिने, २६दिवस** |

**अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी अहमदपूर, यांचे न्यायालयात.**

**( पिठासीन अधिकारी - आर.डी. वाबळे )**

**(न्यायनिर्णय अधिघोषित दिनांक– ०८/०५/२०२६)**

**नियमित फौजदारी खटला क्रमांक.१६०/२०१८** **निशाणी क्रमांक -**

गुन्हा नोंद क्र.२९४/२०१८, पो. स्टे. अहमदपूर

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष.** | | **महाराष्ट्र शासन,**<br>तर्फे पोलीस निरीक्षक,<br>पोलीस स्टेशन, अहमदपूर,<br>ता. अहमदपूर, जिल्हा लातूर. |
| **अभियोग पक्षा तर्फे.** | | सहाय्यक शासकिय अभियोक्ता श्री. ए.एन.काकडे |
| **आरोपी.** | | **१. वसंत गणपती घोगरे,**<br>वय- ६० वर्षे, कामधंदा - शेती,<br>**२. विकास वसंत घोगरे,**<br>वय- ३२ वर्षे, कामधंदा -शेती,<br>**३. राहुल वसंत घोगरे,**<br>वय- २८ वर्षे, कामधंदा -शेती,<br>सर्व रा.टाकळगाव, अहमदपूर, जि.लातूर. |
| **आरोपींतर्फे विधीज्ञ.** | | श्री.एस.व्ही.देशमुख |

**भाग- ब**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(ii)अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| फिर्याद दाखल दिनांक | | १४.०८.२०१८ |
| दोषारोप पत्र पाठविल्याचा दिनांक | | २९.१०.२०१८ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | | २५.०७.२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | | २०.०४.२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी राखूण ठेवल्याचा दि. | | ०८.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | | ०८.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षे संदर्भात आदेशाचा दिनांक | | निरंक, आरोपींची निर्दोष मुक्त करण्यात येते. |

**आरोपीचा तपशील**

| आरोपीं क्र. | आरोपींचे नावे | अटक दिनांक | जामिना वर सोडल्याचा दि. | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ. प्र. सं. क. ४२८ अन्वये समायोजीत (Set off) करणे बाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | **वसंत गणपती घोगरे** | दि.०१.०९.१८ | -- | भा.दं.सं. कलम ३२६, ३२७, ३४१, ३२३, ५०६ सह ३४ | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| ०२ | **विकास वसंत घोगरे** | दि.०१.०९.१८ | -- | भा.दं.सं. कलम ३२६, ३२७, ३४१, ३२३, ५०६ सह ३४ | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| ०३ | **राहुल वसंत घोगरे** | दि.२६.१०.१८ | -- | भा.दं.सं. कलम ३२६, ३२७, ३४१, ३२३, ५०६ सह ३४ | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

**भाग- क**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(iii)अन्वये)**

| सा.क्र. | साक्षीदारांची नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| ०१ | व्यंकट सोनेराव वाकडे | घटनास्थळ पंच | ४७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | भागवत श्रीराम फड | साक्षीदार | ८२ |
| ०३ | गुणवंत मच्छींद्र घोगरे | साक्षीदार | ८५ |
| ०४ | आयोध्याबाई गुणवंत घोगरे | साक्षीदार | ८७ |
| ०५ | डॉ.धीरज शेषेराव देशमुख | साक्षीदार | ९५ |
| ०६ | भास्कत श्रीधरराव सुर्यवंशी | तपासी अंमलदार | १०३ |
| ०७ | धनराज रुक्माजी जगताप | साक्षीदार | ११० |

## अभियोग पक्षातर्फे दाखल करण्यात आलेले दस्त

| द.क्र. | निशाणी | दस्त वर्णन |
|---|---|---|
| - | - | - |

## न्यायालया मार्फत निशाणी देण्यात आलेले दस्त

| द.क्र. | निशाणी | दस्त वर्णन |
|---|---|---|
| ०१ | दोषारोप पत्र | ०१ |
| ०२ | फेरीस्त | ०२ |
| ०३ | घटनास्थळ पंचनामा | ४८ |
| ०४ | फिर्याद | ८६ |
| ०५ | वैद्यकीय प्रमाणपत्र | ९६ |
| ०६ | शासकीय पंच मिळावेत म्हणून राज्य परिवहन विभाग, अहमदपूर यांना दिलेले पत्र | १०४ |
| ०७ | अटक पंचनामे | १०५ ते १०७ |

## बचाव पक्षाचा पुरावा

| द.क्र. | निशाणी | दस्त वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## अभिलेखावरील मुद्देमाल

| म.क्र. | मुद्देमाल क्र. | दस्त वर्णन |
|---|---|---|
| ०१ | ४२/२०२४ | चार फायबरचे काळया रंगाचे लहान तुकडे |

## न्या य नि र्ण य

(पारीत दिनांक -०८/०५/२०२६)

प्रस्तुत प्रकरण आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२६, ३२७, ३४१, ३२३, ५०६ सह ३४ अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयांसाठी चालविण्यात आले.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे** -

**०२.** फिर्यादी अशोक व्यंकटराव नरवटे यांनी अशी फिर्याद नोंदविली की, दि.१३/०८/२०१८ रोजी १०.०० वाजण्याच्या सुमारास टाकळगाव येथील त्यांच्या घरुन त्यांची मोटारसायकल क्र.एम.एच.२४, ए.ई.८६५७ ने काजळ हिप्परगा येथे महाराष्ट्र ग्रामीण बॅकेत पीक कर्जाची फाईल टाकण्यासाठी १०.३० वाजता आले. परंतु, बॅकेत मॅनेजर नसल्याने ते त्यांच्या घराचे लाईट बील भरण्यासाठी अहमदपूर येथील एम.एस.ई.बी. ऑफीय येथे आले. तेथील इंजिनीअरची भेटून घेवून बील कमी करण्याची विनंती केली असता त्यांनी तुमचे गावचे लाईनमनला भेटून बील कमी करुन घ्या असे सांगितले. नंतर ते लाईनमनला भेटण्यासाठी गेले. परंतु, भेट झाली नाही. त्यानंतर तहसील येथे आले व त्यांचे गावचे तलाठी जाधव याना भेटून शेताच्या ७/१२ उतारा घेतला. फिर्यादी अंदाजे ४.३० वाजण्याच्या सुमारास परत घराकडे किनगांव रोडने त्यांच्या गावी निघाले व काजळ हिप्परगा गावाचे पुढे विसावा धाब्याचे पुढे कॉर्नरवर अंदाजे ५.०० वाजण्याच्या सुमारास पोहचले असता तेथे त्यांच्यासमोर एक क्रुझर गाडी

उभी करुन चार इसमानी त्यांना गाडी बाजूला घेण्यास सांगितले. त्यांनी गाडी बाजूला घेतली असता ते लोक त्यांच्याकडे पळत आले त्यात त्यांचा चुलता वसंत गणपती घोगरे, राहुल वसंत घोगरे, विकास वसंत घोगरे, सर्व रा. टाकळगाव व इतर एक अनोळखी इसम हे शिवीगाळ करीत त्यांना धक्का-बुक्की करू लागले. फिर्यादी यांनी त्यांना धक्का-बुक्की का करता असे म्हणत असताना आरोपी विकासने त्याचे हातातील रॉडने त्यांचे डोक्यात मारुन गंभीर जखमी केले व इतरांनी लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली व त्यांचे खिशातील १२००/- रुपये त्यांच्यापैकी कोणीतरी काढून घेतले आहे.

**०३.** फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, अहमदपूर यांनी आरोपींविरुध्द गुन्हा क्रमांक २९४/२०१८ नोंदविला व पुढील तपास स.फौ. श्री.बी.एस.सुर्यवंशी यांच्याकडे वर्ग करण्यात आला. तपासी अंमलदार यांनी तपासकामी घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला, जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्रे हस्तगत केली व साक्षीदारांचे बयाण नोंदविले. तपासाअंती तपासि अंमलदार यांनी आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

**०४.** आरोपींविरुध्द निशाणी क्र.३६ वर दोषारोप नोंदवून तो त्यांना मराठीत वाचून व समजावून सांगितला. आरोपींनी गुन्हा नाकबूल करुन खटला चालविण्याची मागणी केली.

**०५.** अभियोग पक्षाचा पुरावा नोंदवून झाल्यानंतर सबळ पुरावा अभिलेखावर दिसून आलामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३-१(ब) अन्वये निवेदन नि.क्र.११२ ते ११४ वर नोंदविण्यात आले. त्यामध्ये आरोपींनी खोटी केस केल्याचा बचाव घेतला आहे.

**०६.** प्रस्तुत खटल्याचे निर्णयार्थ खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारण मिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १३/०८/२०१८ रोजी सायंकाळी अंदाजे ५.०० वाजण्याच्या सुमारास अहमदपूर ते अंबाजोगाई जाणाऱ्या रोडवरील काजळ हिप्परग्याच्या पढे आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीला लोखंडी रॉड या प्राणघातक अवजाराने/वस्तुने जाणीवपूर्वक मारुन गंभीर स्वरुपाची दुखापत पोहोचवली, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **...नकारार्थी** |
| २. | वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीच्या खिशातील १२००/- रुपये जबरीने हिसकावून घेण्यासाठी स्वेच्छापुर्वक फिर्यादीस साध्या स्वरुपाची दुखापत पोहोचवली, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **...नकारार्थी** |
| ३. | वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीचा रस्ता अडवून त्यांना गैरपणे निरुध्द केले, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **...नकारार्थी** |
| ४. | वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन वर नमूद फिर्यादी यास लाथा बुक्क्यांनी ईच्छापूर्वक मारहाण करुन साधी दुखापत पोहोचविली, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **...नकारार्थी** |
| ५. | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपींनी आपसात संगनमत करुन वर नमूद फिर्यादी यास जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारीपात्र धाकदपटशा केला, असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **...नकारार्थी** |
| ६. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ५ बाबत :-**

**०७.** मुद्दे क्र.०१ ते ०५ हे एकमेकांशी संलग्न असून पुनरावृत्ती टाळण्याकरीता

एकत्रीत चर्चीले आहेत.

**०८.** अभियोग पक्षातर्फे घटनास्थळ पंच व्यंकट सोनेराव वाकडे (सा. क्र.१) यांचा पुरावा नि.क्र.४७ वर नोंदविण्यात आला. त्यांनी पुराव्याचे दरम्यान असे कथन केले की, दि.१५/०८/२०१८ रोजी ते पोलिसांसोबत काजळ हिप्परग्याच्यासमोर उगिलेवाडी फाटयाच्या थोडे समोर घटनास्थळ पंचनाम्यासाठी गेले होते. त्याठिकाणी दुसरे पंच श्रीराम फड हजर होते. घटनास्थळी दगडाचा चुरा दिसला. त्यांचेसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला. साक्षीदाराने घटनास्थळ पंचनाम्यावरील त्यांची सही व त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे मान्य केले. या साक्षीदाराने घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.४८) शाबीत केला. उलटतपासाचे दरम्यान साक्षीदार मान्य करतो की, घटनास्थळावरील रस्ता घटनेच्या वेळी छोटा व खड्डयांचा होता. आरोपींच्या विधीज्ञांनी दिलेल्या इतर सूचना साक्षीदाराने नाकारल्या आहेत.

**०९.** अभियोग पक्षातर्फे घटनास्थळ पंच भागवत श्रीराम फड (सा. क्र.२) यांचा पुरावा नि.क्र.८२ वर नोंदविण्यात आला. त्यांनी पुराव्याचे दरम्यान असे कथन केले की, डेपो मॅनेजर यांच्या सांगण्यावरुन ते दि.१५/०८/२०१८ रोजी पंचनाम्यासाठी गेले होते. घटनास्थळावरुन पोलिसांनी त्यांचेसमक्ष मोटारसायकलचे फायबरचे तुकडे जप्त केले. साक्षीदाराला जप्त फायबरचे तुकडे (वस्तु क्र.अ) दाखविण्यात आले. साक्षीदाराने तेच फायबरचे तुकडे त्यांचेसमक्ष जप्त केल्याचे सांगितले. उलटतपासाचे दरम्यान साक्षीदार मान्य करतो की, पंचनाम्याच्या वेळी पावसाळा होता. रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडलेले होते. घटनास्थळावरील रस्ता घटनेच्या वेळी अरूंद होता. जप्त फायबरचे तुकडे कोणत्या गाडीचे आहेत, हे सांगू शकत नाहीत. आरोपींच्या विधीज्ञांनी दिलेल्या इतर सूचना साक्षीदाराने नाकारल्या आहेत.

**१०.** अभियोग पक्षातर्फे फिर्यादी गुणवंत मच्छींद्र घोगरे (सा.क्र.३) यांचा पुरावा नि.क्र.८५ वर नोंदविण्यात आला. त्यांनी पुराव्याचे दरम्यान असे कथन केले की,

दि.१३/०८/२०१८ रोजी ४:३० वाजताचे दरम्यान ते हिप्परगा गावाच्या पुढे विसावा धाब्याजवळून मोटारसायकलने जात असताना पाठीमागून एक क्रुझर आली. त्यावरील चालकाने त्यांना मादरचोद, मोटारसायकल बाजूला घे, तुला दिसत नाही का असे म्हणाले व मोटारसायकलला वाहन अडवे लावले. फिर्यादी पुढे असे कथन करते की, आरोपींनी त्यांना शिवीगाळ केली. आरोपी विकास घोगरे याने रॉडने डोक्यात मारून त्यांना जखमी केले. आरोपी राहुल घोगरे, वसंत घोगरे यांनी त्यांना धक्का-बुक्की केली. त्यानंतर फिर्यादी बेशुध्द होवून पडले. फिर्यादीचा मेहुणा बालाजी कोदळे यांनी त्यांना अहमदपूर येथे दवाखान्यात दाखल केले. फिर्यादी पुढे असे कथन करते की, त्यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली. फिर्यादीला फिर्याद दाखवली असता त्यावरील त्याची सही व मजकुर खरा व बरोबर असल्याचे फिर्यादीने सांगितले. त्यामुळे, फिर्यादीने फिर्याद (नि.क्र.८६) शाबीत केली. फिर्यादीला सरतपासाचे दरम्यान फायबरचे तुकडे (वस्तु क्र.अ) दाखविण्यात आली असता फिर्यादीने ते फायबरचे तुकडे त्याचे मोटारसायकलचे असल्याचे मान्य केले.

**११.** फिर्यादीचा उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस.व्ही.देशमुख यांनी नोंदविला. फिर्यादी मान्य करतो की, आरोपींनी अशाच प्रकारे मारहाण केली याबाबत त्यांनी सन २०१२ मध्ये फौजदारी प्रकरण दाखल केले होते. त्यामध्ये आरोपींची निर्दोष मुक्तता झाली होती. फिर्यादी पुढे हे मान्य करतो की, आरोपी क्र.१ त्यांचा चुलता आहे. आरोपी व त्यांचेमध्ये शेतीच्या व इतर कारणांवरुन नेहमी वाद होतात. साक्षीदार हेही मान्य करतो की, घटना दि.१३/०८/२०१८ रोजी झाली असताना फिर्याद विचार-विनीमय करुन दि.१४/०८/२०१८ रोजी नोंदवली. साक्षीदार पुढे हे मान्य करतो की, दि.१३/०८/२०१८ रोजी ते पोलीस ठाण्यात गेले नाहीत किंवा त्यांचा जबाब त्यादिवशी नोंदविण्यात आला नाही. घटना पावसाच्या दिवसात झाली, घटनेच्या वेळी घटनास्थळावरील रस्ता अरुंद होता, हेही फिर्यादी मान्य करतो. साक्षीदार पुढे हे

मान्य करतो की, क्रुझरवरील चालकाने त्यांना मादरचोद, मोटारसायकल बाजूला घे, तुला दिसत नाही का असे म्हणाले, हा मजकुर फिर्यादीत नमूद नाही. आरोपींच्या विधीज्ञांनी दिलेल्या इतर सूचना साक्षीदाराने नाकारल्या आहेत.

**१२.** अभियोग पक्षातर्फे अयोध्याबाई गुणवंत घोगरे (सा.क्र.४) यांचा पुरावा नि.क्र.८७ वर नोंदविण्यात आला. त्यांनी पुराव्याचे दरम्यान असे कथन केले की, फिर्यादी त्यांचे पती आहेत. दि.१३/०८/२०१८ रोजी विसावा ढाब्याच्या समोर त्यांना आरोपींनी मारहाण केली होती. त्यांचा भाऊ बालाजी याने फिर्यादीला दवाखान्यात दाखल केले. घटनेची माहिती त्यांना बालाजी याने दिली. उलटतपासाचे दरम्यान साक्षीदार मान्य करते की, आरोपी व त्यांचेमध्ये शेतीवरुन नेहमी वाद होतात. त्यांचे पतीने आरोपींविरुध्द यापुर्वीही केस दाखल केली होती. त्यामध्ये आरोपींची निर्दोष मुक्तता झाली आहे. मारहाणीची घटना त्यांनी प्रत्यक्ष पाहिली नाही. घटनेबाबत त्यांना त्याच्या पतीकडून समजले. आरोपींच्या विधीज्ञांनी दिलेल्या इतर सूचना साक्षीदाराने नाकारल्या आहेत.

**१३.** अभियोग पक्षातर्फे वैद्यकीय अधिकारी डॉ.धीरज शेषेराव देशमुख (सा.क्र.५) यांचा पुरावा नि.क्र.९५ वर नोंदविण्यात आला. त्यांनी पुराव्याचे दरम्यान असे कथन केले की, ते देशमुख हॉस्पीटल, अहमदपूर येथे वैद्यकीय व्यवसाय करतात. दि.१३/०८/२०१८ रोजी संध्याकाळी ६.१० मिनीटांनी त्यांनी गुणवंत घोगरे यांची वैद्यकीय तपासणी केली. त्यांना झालेल्या जखमांबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र नि.क्र.९६ प्रमाणे वैद्यकीय प्रमाणपत्र दिले. उलटतपासाचे दरम्यान साक्षीदार मान्य करतो की, जखमीला वैद्यकीय तपासणीसाठी पोलिसांनी पाठवले नव्हते. जखमा कधी झाल्या असाव्यात हे वैद्यकीय प्रमाणपत्रात नमूद नाही. वैद्यकीय प्रमाणपत्रात जखमीला कोणी दाखल केले, हेही नमूद नाही. साक्षीदार पुढे हे मान्य करतो की, एखादी व्यक्ती मोटारसायकलवरुन पडल्यास वैद्यकीय प्रमाणपत्रात नमूद जखमा होवू शकतात.

**१४.** अभियोग पक्षातर्फे तपासी अधिकारी भास्कर श्रीधरराव सुर्यवंशी (सा. क्र.६) यांचा पुरावा नि.क्र.१०३ वर नोंदविण्यात आला. त्यांनी पुराव्याचे दरम्यान असे कथन केले की, या गुन्हयाचा तपास त्यांच्याकडे देण्यात आला. तपासाच्या दरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.४८) तयार केला. घटनास्थळावरुन मोटारसायकलचे फायबरचे तुटलेले तुकडे (वस्तु क्र.अ) जप्त केले. साक्षीदारांची तपासटिपने नोंदवली. आरोपींना अटक केली. त्याबाबत अटक पंचनामे (नि.क्र.१०५ ते १०७) तयार केले. जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर दोषारोपपत्र दाखल केले. उलटतपासाचे दरम्यान तपासी अधिकारी मान्य करतो की, तपासाचे दरम्यान त्यांनी हॉटेल विसावा ढाबा येथील कर्मचाऱ्यांचे जबाब नोंदविलेले नाहीत. घटनास्थळावरील रस्त्याच्या दोन्ही बाजूला शेती आहे. त्या शेतकऱ्यांचे जबाब नोंदविलेले नाहीत. घटनेच्या काळात अहमदपूर-अंबाजोगाई रोडवर खड्डे पडलेले होते. आरोपींच्या विधीज्ञांनी दिलेल्या इतर सूचना साक्षीदाराने नाकारल्या आहेत.

**१५.** अभियोग पक्षातर्फे धनराज रुक्माजी जगताप (सा. क्र.७) यांचा पुरावा नि.क्र.११० वर नोंदविण्यात आला. त्यांनी पुराव्याचे दरम्यान असे कथन केले की, फिर्यादी त्यांचे मामाचा मुलगा आहे. दि.१३/०८/२०१८ रोजी बालाजी कोदळे यांचे वाहनातून ते फिर्यादीचे गावी टाकळगाव येथे गेले होते. परचंडा येथे देवाचे दर्शन घेतल्यानंतर अहमदपूर-अंबाजोगाई रोडवर असलेल्या हॉटेल विसावा येथे बालाजी कोदळे यांनी गाडी थांबविण्यास सांगितले. त्याठिकाणी बालाजी यांचे मेहुणे यांना त्यांनी गाडीत उचलून टाकले. फिर्यादीचे डोक्याला मार लागला होता. फिर्यादीला अहमदपूर येथील देशमुख हॉस्पीटलमध्ये उपचाराकामी दाखल केले. फिर्यादीने त्यांना आरोपींनी मारहाण केल्याचे सांगितले. उलटतपासाचे दरम्यान साक्षीदार मान्य करतो की, फिर्यादी त्यांचा पाहुणा आहे. फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये पुर्वीपासून वाद आहेत. घटनेची प्रत्यक्ष माहिती त्यांना नाही. आरोपींच्या विधीज्ञांनी दिलेल्या इतर सूचना साक्षीदाराने

नाकारल्या आहेत.

**१६.** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या सर्व साक्षीदारांचे साक्षीचे अवलोकन केले असता असे निर्दशनास येते की, साक्षीदार क्र.४ अयोध्याबाई ही फिर्यादीची पत्नी आहे. साक्षीदार क्र.७ धनराज जगताप हा फिर्यादीचे मामाचा मुलगा आहे. या तिन्ही साक्षीदारांच्या पुराव्यातून असे निष्पन्न होते की, हे तिन्ही साक्षीदार घटनेच्या वेळी घटनास्थळावर हजर नव्हते. त्यांना घटनेची माहिती फिर्यादीकडून मिळालेली आहे. तीन्ही साक्षीदार घटनास्थळावर घटनेच्या वेळी हजर नसल्याने त्यांना घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणता येणार नाही. त्यामुळे, त्यांचा पुरावा हा प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचा पुरावा गृहीत धरता येणार नाही. हे साक्षीदार प्रत्यक्षदर्शी नसले तरी उलटतपासातून असे निष्पन्न होते की, फिर्यादी व आरोपींमध्ये पुर्वीपासूनचे वाद आहेत. फिर्यादी व आरोपींमध्ये शेतीचे कारणावरुन वाद आहेत. फिर्यादीने यापुर्वीही आरोपींविरुध्द फौजदारी प्रकरणे दाखल केली होती.

**१७.** अभियोग पक्षाने तपासलेल्या दोन्ही पंच साक्षीदारांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे निर्दशनास येते की, घटनास्थळ हे रोडवर होते. घटनास्थळावरुन पोलिसांनी फायबरचे तुकडे जप्त केले असले तरी ते फिर्यादीचे वाहनाचेच होते हे निश्चित होत नाहीत. फायबरचे तुकडे कोणत्या वाहनाचे आहेत हे साक्षीदार सांगू शकत नसल्याचे साक्षीदारांनी मान्य केलेले आहे. घटनास्थळ रस्त्यावर असल्यामुळे फायबरचे तुकडयांवरुन त्याठिकाणी आरोपी व फिर्यादीचे दरम्यान मारहाण झाल्याचे व आरोपींनी फिर्यादीचे मोटारसायकलचे नुकसान केल्याचे पंचनाम्यातून संशयविरहीत सिध्द होत नाही. अभियोग पक्षाचे असे कथन आहे की, फिर्यादीला आरोपी विकास याने लोखंडी रॉडने डोक्यात मारले. परंतु, लोखंडी रॉड जप्त करण्यात आलेला नाही. त्यामुळेही, अभियोग पक्षाचे कथनाबाबत संशय निर्माण होतो.

१८. वर नमूद विवेचणावरून असे स्पष्ट होते की, या घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अभियोग पक्षाकडे नाही. फिर्यादीचे संपुर्ण प्रकरण, फिर्यादीचा पुरावा व वैद्यकीय अधिकारी यांचे पुराव्यावर अवलंबून असल्याचे दिसते. फिर्यादी याने उलटतपासात मान्य केले आहे की, त्यांनी आरोपी व इतरांविरुध्द सन २०१२ मध्ये अशीच फौजदारी केस दाखल केली होती. त्या प्रकरणात आरोपींची निर्दोष मुक्तता झाली आहे. आरोपी व त्यांचेमध्ये शेतावरुन वाद आहे. फिर्यादीचे या कथनांवरुन आरोपी व फिर्यादीमध्ये पुर्व वैमनस्य असल्याचे निदर्शणास येते. फिर्यादी याने यापुर्वीही अशाच प्रकारच्या केसेस आरोपींविरुध्द दाखल केल्यामुळे फिर्यादीचे कथनांवर विसबूंन राहता येणार नाही. घटनास्थळ हे अहमदपूर ते अंबेजोगाई या रस्त्यावरील होते. घटनेच्या वेळी हा रस्ता अरुंद व खड्डयांचा होता. आरोपींचा बचाव की, फिर्यादी मोटारसायकलवरुन पडल्यामुळे झालेल्या जखमांचा गैरफायदा घेवून आरोपींविरुध्द खोटी केस दाखल केली हा बचाव अशा परिस्थितीत फिर्यादीचे कथनांवर संशय निर्माण करण्यास पुरेसा आहे. तपासी अधिकाऱ्याचे पुराव्यातून असेही निष्पन्न होते की, घटनास्थळावर विसावा ढाबा आहे. परंतु, अभियोग पक्षाने या ढाब्यावरील कर्मचारी किंवा त्यावेळी रस्त्यावरुन जाणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळेही, अभियोग पक्षाच्या प्रकरणाबाबत संशय निर्माण होत आहे. घटनेची फिर्याद घटनेच्या दुसऱ्या दिवशी नोंदविण्यात आली. उशीरा फिर्याद का नोंदवली याबाबतचे स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. अशा परिस्थितीत अभियोग पक्षाच्या प्रकरणाबाबत संशय निर्माण होत असल्याने फौजदारी कायद्याचे तत्त्वाप्रमाणे संशयाचा फायदा आरोपींना मिळणे क्रमप्राप्त आहे. अभियोग पक्ष हे संशय विरहीत सिध्द करु शकला नाही की, घटनेच्या वेळी फिर्यादीला संगनमत करुन रस्ता अडवून गैरपणे निरुध्द केले. फिर्यादीच्या डोक्यात आरोपीने लोखंडी रॉडने मारहाण करुन त्यांना गंभीर जखमी केले, त्यांचेकडील रक्कम रुपये १२००/- जबरीने हिसकावून घेतले. तसेच, आरोपींनी त्यांना

लाथा-बुक्क्यांनी मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिली, म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ५ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ०५:-</u>**

**१९.** **मुद्दे क्रमांक ०१ ते ०५ चे उत्तर नकारार्थी** नोंदविण्यात आल्यामुळे व अभियोग पक्ष, आरोपींवरील दोषारोप निःसंशयपणे शाबीत करण्यात अपयशी ठरल्यामुळे आरोपीं हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहेः-

**-ः <u>आ दे श</u> ः-**

**१.** आरोपी क्र.१ ते ३ यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान कलम ३२६, ३२७, ३४१, ३२३ व ५०६ सह कलम ३४ अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२.** आरोपींचे जामीन बंधपत्रे व जातमुचलके रद्द करण्यात येतात.

**३.** आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ चे अनुपालनास्तव प्रत्येकी रुपये १५,०००/- चे जामीन बंधपत्र व जातमुचलका सादर करावा.

**४.** जप्त मुद्देमाल चार फायबरचे तुकडे हे मुल्यहीन असल्याने अपील कालावधी संपल्यानंतर कायद्यातील तरतुदींप्रमाणे नष्ट करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर.)

Digitally signed by WABALE RAMDAS DAULAT
Date: 2026.05.08 14:59:39 +0530

**( आर.डी. वाबळे )**

स्थळ - अहमदपूर.
दिनांक -०८/०५/२०२६.

अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.